**DR.BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,**
**CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004**
**Maharashtra (India)**
NAAC – Re-accredited "A+"
**Tele. :**
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजीनगर
**४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)**
**नॅक समितीतर्फे "अ +" दर्जा प्राप्त**

**संदर्भ क्र.परीक्षा/बी.एस्सी./अ.मु./प्रा. प./२०२५-२६/** 1997 **दि.३१.१०.२०२५**

# "परिपत्रक"

**महाविद्यालय स्तरावरील अंतर्गत मूल्यमापन/प्रात्याक्षिक परीक्षा (College Assessment)**

**प्रति,**
**मा.प्राचार्य/प्राचार्या,**
सर्व संलग्नित कला, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालये,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

**विषयः- ऑक्टोंबर-२०२५ पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालय स्तरावरील (College Assessment) अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्याक्षिक परीक्षा आयोजित करणेबाबत**

**संदर्भः-** या कार्यालयाचे परीपत्रक क्रमांक/परीक्षा/४०/२०२३/अभ्यासक्रम वि./कौशल्य आधारित अनुलंब परीक्षा/२०२३/१५६७३८४, दिनांक- २३.१०.२०२३.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्यानुषंगाने कळविण्यात येते की, **पदवी (कला, विज्ञान व तंत्रज्ञान वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र) अभ्यासक्रमाच्या ऑक्टोंबर/नोव्हेंबर-२०२५** च्या घेण्यात येणाऱ्या महाविद्यालय स्तरावरील अंतर्गत मूल्यमापन/प्रात्याक्षिक परीक्षा (College Assessment) खालील तक्त्यात नमूद केलेल्या कालावधीत घेण्याचे ठरले असून सदरील परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी पुढील प्रमाणे कार्यपध्दतीचे पालन करून प्रस्तुत परीक्षा घेण्यात याव्यातः

| विद्याशाखा | परीक्षेचे नाव | महाविद्यालय स्तरावरील अंतर्गत मूल्यमापन/प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|
| १. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा<br>२. वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र विद्याशाखा<br>३. मानव्य विज्ञान विद्याशाखा<br>४. अंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा | 1. All Faculty Practical Exams<br>2. Skill Enhancement Course<br>3. Curricular Courses<br>4. Vocational Skill Courses<br>(Sr. No. 1 to 4 College Assessment) | दि. ०८.११.२०२५<br>ते<br>दि. १५.११.२०२५ |

(महत्वाची सुचना : विद्यापीठामार्फत सद्यस्थितीत (०१) पॅटर्न-२०१३, (०२) पॅटर्न-२०१४, पॅटर्न-२०१८, पॅटर्न-२०१९, व पॅटर्न-२०२२, (०३) पॅटर्न-NEP-2024 हे अभ्यासक्रम राबविले जात आहे किंवा कार्यरत आहेत. तद्अनुषंगाने सर्व पॅटर्नच्या प्रवेशित परीक्षार्थींच्या (Fresher, Repeater) अंतर्गत मूल्यमापन/प्रात्याक्षिक परीक्षा आयोजित करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाचा असा मानस आहे की, प्रस्तुत वेळापत्रकानुसार पॅटर्ननिहाय, सत्रनिहाय व विषयनिहाय महाविद्यालयाच्या स्तरावर सुरळीत पार पडतील अशा पध्दतीने बॅचेस तयार करून या कार्यालयास सहकार्य करावे.)

Dr.Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar * Examinations

**DR.BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,**
**CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004**
**Maharashtra (India)**
NAAC – Re-accredited "A+"
**Tele. :**
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजीनगर
४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे "अ +" दर्जा प्राप्त

प्रस्तुत परीक्षेकरीता प्रश्नसंच हे महाविद्यालयाने संबंधित विषयाच्या मान्यताप्राप्त प्राध्यापकांकडून तयार करुन घ्यावेत तसेच परीक्षेनंतर सदरील उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर त्वरीत करण्यात यावे.

१. परीक्षेचे वेळापत्रक, तुकडया (बॅचेस) हे विद्यापीठाच्या प्रचलीत नियमाप्रमाणे तयार करावे व वेळापत्रक विद्यार्थ्यांसाठी सूचना फलकावर लावावेत.

२. **पदवी (कला, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन)** सर्व सत्रांचे प्रात्याक्षिक परीक्षेसाठी बहिस्थ परीक्षक (External Examiner) अनिवार्य आहे, शक्य तो नजिकच्या महाविद्यालयातील अध्यापकांची नेमणूक करावी.

३. प्रात्यक्षिक परीक्षेचे देयके विद्यापीठाच्या प्रचलित नियमाप्रमाणे अदा करण्यात येतील.

४. **अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षेच्या** गुणयाद्या ***(Mark List)*** परीक्षकाने मूल्यमापन करुन संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे त्वरीत हस्तांतरीत कराव्यात, तद्नंतर प्राचार्यांनी गुणयाद्या ***Data Entry*** करीता महाविद्यालयाच्या परीक्षा प्रमुखांकडे तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

५. **पदवी (कला, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन)** अंतर्गत मूल्यमापन / प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणयाद्या ***ADES (Assessment Data Export File)*** वर ***Data Entry*** करून ***(www.bamua.digitaluniversity.ac)*** या संकेतस्थळावर निकाल घोषित करण्याकरिता उपलब्ध झाल्याबाबतची खात्री करूनच हार्ड कॉपी प्रिंट ***(Hard Copy Print)*** संबंधीत परीक्षक/नियामक व प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह परीक्षेच्या गुणयाद्यांसोबत फाईल्समध्ये परीक्षार्थीच्या उपस्थिती अहवालासहित परीक्षा विभागातील संबंधीत कक्षाकडे विहित मुदतीत सादर करावे.

६. परीक्षकाने आसन क्रमांकानुसार वर्गनिहाय/वर्षनिहाय गुणयाद्या स्वतंत्ररित्या तयार कराव्यात.

७. प्राचार्यांनी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय परीक्षार्थींना अंतर्गत मूल्यामापन व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता इतर महाविद्यालयात ***(Out of Turn)*** पाठविण्यात येऊ नयेत.

८. विज्ञान विद्या शाखेच्या सर्व अभ्यासक्रमासाठी Practical/Dissertation/Oral/Viva-Voce या परीक्षेसाठी विद्यापीठामार्फत पदवी/पदव्युत्तर स्थरावर परीक्षक नेमण्यात येतात. सदरील परीक्षकांचे प्रवास भत्ता व दैनंदिन भत्याचे देयके (TA/DA) संबंधीत महाविद्यालयामार्फत नियमानुसार देण्यात यावेत. हा खर्च महाविद्यालयास परीक्षेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कमेतुन करण्यात यावा.

९. प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयात अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षा विद्यापीठाच्या मान्यताप्राप्त परीक्षकांमार्फत घेतल्याचे प्रमाणपत्र गुणयाद्यांबरोबर विद्यापीठाच्या संबंधित कक्षाकडे पाठवावे.

१०. प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, परीक्षा विभागात परीक्षेसंबंधी पाठवावयाच्या दस्तऐवजांच्या प्रत्येक पानावर वरच्या बाजुला कोपऱ्यात परीक्षा केंद्र क्रमांक असलेला शिक्का व स्वाक्षरीसह दस्तावेज तयार

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar * Examinations

**DR.BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY,**
**CHHATRAPATI SAMBHAJINAGAR -431 004**
**Maharashtra (India)**
NAAC – Re-accredited "A+"
**Tele. :**
Office PBX: (0240) 2403399/400
B.Sc. :- (0240) 2403181
FAX : (0240) 2403199/188
TELEGRAM : BAMUSITY
WEB SITE :www.bamu.net
:http://bamua.digitaluniversity.ac.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
छत्रपती संभाजीनगर
**४३१ ००४ महाराष्ट्र (भारत)**
नॅक समितीतर्फे "अ +" दर्जा प्राप्त

करणे अनिवार्य राहील तसेच गठ्ठयातून निखळल्यास/गहाळ झाल्यास या कार्यालयाची जबाबदारी राहणार नाही.

११. विद्यापीठाकडून परिक्षार्थींचे बैठक क्रमांक देण्यास ऊशीर होत असल्यास पी.आर.एन. नंबरने/ अनुक्रमांकाने प्रात्याक्षिक परीक्षा महाविद्यालयाने घेण्यास हरकत नाही परंतु पी.आर.एन. नंबर समोर परीक्षा क्रमांक येणे आवश्यक राहील.

१२. **पदवी (कला, विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन) अंतर्गत आणि प्रात्यक्षिक परीक्षा** या परीपत्रक क्रमांक/परीक्षा/४०/२०२३, संदर्भ क्रं. अभ्यासक्रम वि./कौशल्य आधारित अनुलंब परीक्षा/२०२३/१५६७३८४, दिनांक- २३.१०.२०२३ अन्वये महाविद्यालयीन स्तरावर आयोजित करावयाची असल्याने **सदरील विषयाच्या उत्तरपत्रिका हया विद्यापीठात जमा न करता महाविद्यालयातच जतन करुन ठेवाव्यात.**

१३. अंतर्गत मूल्यमापन आणि प्रात्यक्षिक परीक्षांच्या गुणयाद्या विहित मुदतीत विद्यापीठास पाठविण्याची जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांवर राहील. उपरोक्त नमूद गुणयाद्या या विहित मुदतीत सादर न केल्यास दि. १४.१२.२०२१ रोजी झालेल्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीतील मान्यतेनुसार निकाल लागल्याच्या दिनांकापासून पहिले १० दिवस रु.२०००/- (अक्षरी रु. दोन हजार फक्त) प्रती विद्यार्थी आणि नंतरच्या ५ दिवसांसाठी रु. ३०००/- (अक्षरी रु. तीन हजार फक्त) **प्रती विद्यार्थी दंड महाविद्यालयास आकारुन निकाल घोषित करण्यात येईल तद्नंतर कुठल्याही सबबीवर कोणताही बदल केला जाणार नाही** याची नोंद घ्यावी.

1/11 2025

संचालक
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University * Chhatrapati Sambhajinagar * Examinations